I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल

**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) **P.S. (पोलीस ठाणे):** एमआईडीसी पैठण **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0039 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 31/01/2026 00:36 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्हयाची घटना):**

1 **Day (दिवस):** शुक्रवार **Date from (दिनांक पासून):** 30/01/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 30/01/2026

**Time Period (कालावधी):** प्रहर ६ **Time From (वेळेपासून):** 15:09 तास **Time To (वेळेपर्यंत):** 15:09 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 30/01/2026 **Time (वेळ):** 22:00 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 018 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 30/01/2026 23:23 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** उत्तर, 15 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** कारकीन,पैठण

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राजु भाऊलाल नांगलोत

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1984

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | छत्रपती संभाजीनगर, छत्रपती संभाजीनगर, एमआईडीसी पैठण , छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण), महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | छत्रपती संभाजीनगर, छत्रपती संभाजीनगर, एमआईडीसी पैठण , छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण), महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-7720872555

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| **S. No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address(वर्तमान (पत्ता))** |
|---|---|---|---|---|
| 1 | शुभम भरत रोकडे | | | 1. Town/Village (शहर / गाव): जैन स्पीनर स्टाफ,Tehsil (तहसील): पैठण,Police Station (पोलीस ठाणे): एमआईडीसी पैठण,District (जिल्हा): छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण),State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S. No. (अ.क्र.)** | **Propertty Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (विवरण)** | **Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये)** |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| **S. No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.)** |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दि.30/01/2026

मी राजु भाऊलाल नांगलोत वय 42 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर मो नं. 7720872555

मी दिनांक 30/01/2026 रोजी ला.प्र.वि. कार्यालय, छत्रपती संभाजीनगर कार्यालयात हजर असताना, मला मा. पोलीस अधीक्षक यांनी त्यांचे कक्षात बोलावुन घेवुन समक्ष हजर असलेले तक्रारदार

जिब्राईल ईस्माईल शेख वय-32 वर्षे व्यवसाय- शेती व मोटार सायकल मॅकेनिक, रा. कारकीन ता.पैठण जि.छत्रपती संभाजीनगर यांची ओळख करुन देवुन, त्यांची लाचे संदर्भात तक्रार असल्याचे सांगुन त्यांचे तक्रारीवर कारवाई करणेसाठी पंच उपलब्ध करुन घेवुन पुढील कारवाई करणेबाबत आम्हास तोंडी आदेश दिला. त्यावेळी आम्ही सदर तक्रारदार यांना विचारल्यावरुन त्यांनी त्यांची तक्रार लेखी लिहुन दिली. ती पुढील प्रमाणे.

मी जिब्राईल ईस्माईल शेख वय-32 वर्षे व्यवसाय- शेती व मोटार सायकल मॅकेनिक, रा. कारकीन ता.पैठण जि.छत्रपती संभाजीनगर,

पोलीस निरीक्षक श्री राजु नांगलोत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर, यांचे कक्षात दोन पंचासमक्ष महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, शाखा ढोरकीन ता पैठण येथील वायरमन शुभम रोकडे, यांचेकडुन मला लाचेची मागणी होत असले बाबत तक्रार देतो की,

मी वरील प्रमाणे असुन माझी कारकीन ता पैठण येथे गट नं. 160 मध्ये शेती असुन सदर शेती माझे नावावर आहे. ज्यामध्ये एक विहीर आहे. मला शेतात सौर पंपाची आवश्यकता असल्याने मी शासनाची मागेल त्याला सौर कृषी पंप योजने अंतर्गत CSC सेंटर मार्फत ऑनलाईन अर्ज केला होता. त्याचा लाभार्थी क्रम MT4414100720252 असा असुन त्यासाठी मी 21982/- रुपये ऑनलाईन पध्दतीने भरणा केला होता.

दिनांक 17/01/2026 रोजी माझे शेतात मी घरी नसतांना माझे वडील ईस्माईल शेख हे घरी असतांना सर्वे करण्यात आला होता. त्यानंतर मला दिनांक 23/01/2026 रोजी मला महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, शाखा ढोरकीन ता पैठण येथील शुभम रोकडे, वायरमन यांचा फोन आला व म्हणाले की, मी तुझा सौर पंपाचा सर्वे पुर्ण केला आहे त्यासाठी तु मला 2000/- रुपये बक्षीस दे नाहीतर मी तुझा सर्वे ऑनलाईन कॅन्सल करतो. असे म्हणाले.

मला वायरमन श्री. शुभम रोकडे यांना लाच रक्कम देण्याची इच्छा नाही. म्हणुन मी त्यांचे विरुध्द कारवाई होणे करिता आपल्याकडे तक्रार करीत आहे. मी आज दिनांक 30/01/2026 रोजी कारकीन गावात वायरमन श्री. शुभम रोकडे यांची भेट घेणार आहे. सदर भेटीत श्री.रोकडे यांनी माझ्याकडे सौर पंपाचा सर्वे केला म्हणुन बक्षीस स्वरुपात लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी ही विनंती

माझा वायरमन श्री. रोकडे यांच्यासोबत कोणताही पैशाचा देण्याचा घेण्याचा किंवा उसनवारीचा व्यवहार नसुन वैर दुश्मनी नाही.

माझा वायरमन श्री. रोकडे यांच्यासोबत कोणताही पैशाचा देण्याचा घेण्याचा किंवा उसनवारीचा व्यवहार नसुन वैर दुश्मनी नाही.

तक्रारदार श्री. जिब्राईल शेख हे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, शाखा ढोरकीन ता पैठण येथील वायरमन, शुभम रोकडे, यांना दि. 30/01/2026 रोजी भेटण्यासाठी जाणार असल्याचे सांगीतले. त्यावेळी मी लागलीच दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेतले. त्यावेळी मी तक्रारदार श्री जिब्राईल शेख यांना स्टाफ, शासकीय पंच यांचेशी ओळख करुन दिली. मी सर्वांना तक्रारीची पडताळणी करणार आहोत असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार श्री जिब्राईल शेख यांची लेखी तक्रार माझ्यासह पंचांनी वाचुन त्यावर सहया केल्या. तक्रारीचे अनुषंगाने वायरमन शुभम रोकडे हे तक्रारदार श्री जिब्राईल शेख यांना लाचेची मागणी करतात अगर कसे ? याबाबत पंचासमक्ष

लाचमागणी पडताळणी करणे आवश्यक असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही, तक्रारदार, पंच व सापळा पथक गोपनिय आवश्यक त्या सर्व साहित्यासह खाजगी वाहनाने व तक्रारदार हे त्यांचे खाजगी वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातुन 12.00 वाजता निघुन 13.00 वाजता कारकीन गावाचे अलिकडे सुरक्षित ठिकाणी पोहोचलो. तेव्हा आम्ही तक्रारदार व पंचाना लाचमागणी पडताळणी कारवाईचे अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन लोकसेवक वायरमन श्री. रोकडे यांची ड्युटी फिरती असल्याने त्यांना त्यांचे मोबाईल फोनवर स्पीकर मोडवर फोनकरुन संपर्क साधुन भेट घेण्याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन त्यामध्ये SanDisk कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड पंचांचे समक्ष घालुन, त्यामध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनीमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार श्री. शेख जिब्राईल व पंचाना खात्री करुन दिली. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने शासकीय व्हाईस रेकॉर्डर 13.39 वाजता चालु करुन तो तक्रारदार श्री. जिब्राईल शेख यांचे गळयात दोऱ्याचे सहाय्याने अडकवुन तक्रारदार यांना लोकसेवक वायरमन श्री. शुभम रोकडे यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 असे 14.23 वाजता सापळा पथक थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणी परत आले. तेव्हा तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला.

त्यानंतर आम्ही पंच क्रं. 2 यांचे समक्ष पंच क्र. 1 यांना तक्रारदार यांना शासकीय व्हाईस रेकॉर्डर चालु करुन दिल्यानंतर लोकसेवक श्री. रोकडे यांना भेटण्यास गेल्यानंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी सांगीतले की, " मी तक्रारदार श्री. शेख जिब्राईल असे रेकॉर्डर चालु करुन दिल्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. शुभम रोकडे यांना फोन लावुन विचारले की, नमस्ते रोकडे साहेब कुठे हे असे विचारले असता तेव्हा श्री. रोकडे म्हणाले की, खंडोबा मंदीरा जवळ या असे म्हणाले तेव्हा त्यांनी बोलावल्या प्रमाणे आम्ही खंडोबा मंदीराजवऴ गेलो असता तक्रारदार यांनी पुन्हा श्री. रोकडे यांना फोन करुन खंडोबा मंदीराजवळ आल्याचे सांगितले तेव्हा श्री. रोकडे यांनी पाच मिनीट थांबा येतो मंदिराजवळ येतो असे सांगितले. त्यानंतर थोड्या वेळाने एक इसम तक्रारदार यांना येऊन भेटले तेव्हा तक्रारदार म्हणाले की, तुम्ही हे का रोकडे साहेब तेव्हा समोरील व्यक्तीने हो असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी त्यांची ओळख जिब्राईल शेख अशी करुन दिली. त्यावरुन माझी खात्री झाली की, समोरील व्यक्ती ही वायरमन श्री. शुभम रोकडे आहे. तेव्हा श्री. रोकडे म्हणाले की, काय काय डाक्युमेंट आणले तेव्हा तक्रारदार म्हणाले की, मला सोलार ची आवश्यकता आहे. मी सोलारचे पैसे भरुन ठेवले आहे. तेव्हा लोकसेवक श्री. शुभम रोकडे व तक्रारदार यांची सोलार पंपाबाबत चर्चा झाली. त्यानंतर श्री. रोकडे म्हणाले की, एक काम करा पैसे इकडं देऊन टाका तेव्हा तक्रारदार म्हणाले की, किती दयावे लागतील असे म्हणाले असता श्री. रोकडे म्हणाले की, दोन हजार रुपये, एक हजार इलेक्ट्रीशियन ला दयावे लागतील तेव्हा तक्रारदार म्हणाले की, कमी करा ना, मी पहिलेच परेशान हे तेव्हा श्री.रोकडे म्हणाले की, दीड दया मंग जाऊ दया तुमचं म्हणणं, दीड करुन दया,सोलारचे पैसे लाईनमनला आणि साहेबाला दयावे लागते तेव्हा तक्रारदार म्हणाले की, तुम्हाला दीड दिले हजार रुपयात राहीलं पाहीजे होतं राव तेव्हा श्री. रोकडे म्हणाले की, हजार मध्ये नाही बाकीचे पैसे कोणालाच दयायचे नाही. तेव्हा श्री. रोकडे म्हणाले की, दीड दया तुम्हाला दोन थोडी मांगु राहीलो, कॅश आहे का पैसे असे म्हणाले "सदर संभाषणातुन लोकसेवक श्री. रोकडे यांनी तक्रारदार यांना सोलार सर्वे करुन दिल्याचा मोबादला म्हणुन 1,500/- रुपये लाच

स्विकारण्याचे मान्य केल्याचे लाचमागणी पडताळणी मध्ये निष्पन्न झाले. त्यानंतर आम्ही लोकसेवक श्री. शुभम रोकडे, वायरमन यांचेवर सापळा कारवाई करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर तक्रारदार श्री. जिब्राईल शेख यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 500/- रुपये दराच्या 03 भारतीय चलनी नोट असे 1,500/- रुपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार श्री. जिब्राईल शेख व पंचांना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी असलेबाबत खात्री करुन दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळापुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अँथ्रासिन पावडर लावलेले 1,500/- रुपये तक्रारदार श्री. जिब्राईल शेख यांचे शर्टचे डावे बाजुचे छातीवरील खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना देवुन, तक्रारदार यास लोकसेवक श्री. रोकडे यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर त्यांनी त्यांचेकडील रुमालाने वारंवार चेहरा पुसण्याचा इशारा करण्याची सुचना दिली. त्यानंतर पंचांसमक्ष पुन्हा सापळा कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर मध्ये SanDisk कंपनीचे 16 जीबी क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड घालुन 14.58 वा चालु करुन तो तक्रारदार श्री. जिब्राईल शेख यांचे गळयात अडकवुन तक्रारदार व पंच क्रं 1 यांना सापळा कारवाई कामी त्यांचेकडील मोटार सायकलने श्री. रोकडे यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. त्यांचे पाठोपाठ मी सोबत पंच क्रं. 2 व सापळा पथक असे आमचेकडील खाजगी वाहनाने तक्रारदार यांच्या पाठोपाठ सुरक्षित अंतरावर ढोरकीन फाट्यापासुन कचनेर ते कारकीन रोडवर आडोशाला जावुन तक्रारदार नजरेत राहील अशा रितीने थांबलो. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल मधुन फोन लावला त्यानंतर तेथे थोड्याच वेळात एक इसम कारकीन- कचनेर रोडवरील राधाकृष्ण लॉन्स समोर आले तेव्हा त्यांचे दोघांत आपसात चर्चा चालु असतांना तक्रारदार यांनी रुमालाने तोंड पुसण्याचा लाच स्विकृतीचा 15.09 वा. पुर्व नियोजीत ईशारा केला. तेव्हा सापळा पथक सक्रीय होऊन लागलीच तक्रारदार व पंच क्र. 01 यांचे जवळ आलो तेव्हा तक्रारदाराचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर बंद करण्यात आला.

त्यानंतर आम्ही सर्व सापळा पथक, तक्रारदार व पंच क्रं. 2 यांचेसमक्ष पंच क्रं.1 यास सुरक्षीत ठिकाणावरुन निघाल्यापासुन ते नियोजीत इशारा होईपर्यंत काय घडले याबाबत विचारले असता, पंच क्रं.1 याने सांगीतले की, " मी व तक्रारदार असे श्री.रोकडे यांची भेट घेण्यासाठी मोटार सायकले ने गेल्यानंतर तक्रारदार यांनी श्री. रोकडे यांना फोन लावला असता त्यांनी कारकीन-कचनेर रोडवरील राधाकृष्ण लॉन्स समोर थांबण्यास सांगितले तेव्हा तक्रारदार व मी कारकीन-कचनेर रोडवरील राधाकृष्ण लॉन्स समोर आलो असता थोड्याच वेळात श्री. शुभम रोकडे आले तेव्हा तक्रारदार श्री. रोकडे यांना म्हणाले की, मी तुम्हाला दिड हजार रुपये देतो बरं का तेव्हा श्री. रोकडे म्हणाले की, हं तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचे शर्टाचे खिशातुन 1,500/- रुपये काढुन हे दीड हजार रुपये तुम्ही सांगीतले प्रमाणे.. पण हे नां..आपलं सोलारचं काम ओके करुन दया..असे म्हणाले " त्यानंतर आपण आपण श्री. रोकडे यांना ताब्यात घेतले. असे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना विचारपुस केली असता त्यांनी पंच क्र. 1 यांचे प्रमाणेच हकीगत सांगितली. त्यानंतर आम्ही पंचासमक्ष लोकसेवकाचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव शुभम भरत रोकडे, वय- 25 वर्षे, व्यवसाय- नोकरी पद- तंत्रज्ञ, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कार्यालय सब स्टेशन, ढोरकीन तालुका पैठण जि. छत्रपती संभाजीनगर रा. मुळगाव खारतळेगाव ता.भातकुली जि.

अमरावती ह.मु. जैन स्पीनर स्टाफ कुलस्वामीनी कलेक्शनजवळ रविंद्र जाधव यांचेकडे भाड्याने पिंपळवाडी (पिराची) ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर असे असल्याचे सांगीतले.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** ESHWAR DHURAJI JAGDALE (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):** **or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** ESHWAR DHURAJI JAGDALE

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** API

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 2001 | | - | | **चेचक:** क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**